Email : edhr_dist@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ६ वा मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३८० दिनांक ०७ / ०१ / २०१२

विषय : ध्वजदिन निधी संकलन - २०११.

संदर्भ : मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.मासैध्व-२०११/१२५९/प्र.क्र.५०१/२८ दि.२३/११/२०११.

.....

ध्वजदिन निधी संकलन - २०११ या संदर्भात योग्य ते निर्देश मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.मासैध्व-२०११/१२५९/प्र.क्र.५०१/२८ दिनांक २३/११/२०११ च्या पत्रामध्ये देण्यात आले असून सदर पत्राची छायाप्रत या सोबत जोडण्यात आली आहे.

२. परकीय शक्तींपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणाऱ्या सैनिकांचे आपल्यावर फार मोठे ऋण असते. ते अंशतः जरी फेडायला मिळाले तरी आपल्या सर्वांच्या दृष्टीने ती मोठी संधी ठरते. क्षेत्रीय व निगम कार्यालयातील सर्व संबंधीत संवितरण अधिकाऱ्यांना विनंती की त्यांनी सदर पत्राचे अवलोकन करावे व त्यातील सूचना/निर्देशाचे काटेकोरपणे पालन करून नमूद उद्दीष्टानुसार ध्वजदिन निधी संकलीत करावा. सदर ध्वजदिन निधीत द्यावयाचे योगदान हे जिल्हा स्तरावर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात "जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय" आणि विभागीय स्तरावर "संचालक, सैनिक कल्याण विभाग" यांच्या नावाने धनादेशाद्वारे जमा करण्यात यावे.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

*( कर्नल राहुल गोवर्धन, से.नि.)*
*कार्यकारी संचालक (मासं)*

*D:\O&M\Adm.Cir - F.N.348-Dhavjadin Nidhi.doc*
*07/01/2012*

मुख्य मंत्री
महाराष्ट्र

Chief Minister
Maharashtra

सत्यमेव जयते

# मुख्य मंत्री
## महाराष्ट्र

MD/D/6666
13/12/11

महावितरण मुंबई
सामवि ८ र.व.का.
आवक/जावक
नंबर: 1
दिनांक: 5/1/12

M.S.E.D.C.L.
Labour Section
Inward No. 3987
Date 28/12/11

का.सं. / मा.सं. 2061
दिनांक 28/XI/2011

पत्र क्र.मासैध्व-२०११/१२५९/प्र.क्र.५०१/२८
दिनांक : २३/११/२०११

स.न.वि.वि.

C.I.R.O.
Pl. discuss
(a) action taken
(b) time frame

विषय:- ध्वजदिन निधी संकलन - २०११

आपल्या देशाच्या सशस्त्र दलातील सैनिक हा आपल्या सर्वांचा प्रेमाचा, आदराचा आणि अभिमानाचा विषय होय. देशाच्या बहुमोल स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे तो प्राणपणाने रक्षण करतो. आपत्तीच्या काळात आपद्ग्रस्त देशबांधवांच्या मदतीलाही धावून जातो. उन्हातान्हाची, थंडीपावसाची वा कोणत्याही अडचणीची पर्वा न करता हा बहादूर जवान आपली कर्तव्ये बजावत असतो. परकीय शक्तीपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी आपल्या पाठीशी भक्कमपणे अहोरात्र उभ्या राहणा-या या सैनिकांचे आपल्यावर फार मोठे ऋण असते. ते अंशतः जरी फेडावला मिळाले तरी आपल्या सर्वांच्या दृष्टीने ती मोठी संधी ठरते. दरवर्षी याच भावनेतून ७ डिसेंबर, हा दिवस सशस्त्र दलांचा ध्वजदिन म्हणून साजरा होतो.

२. मे १९९९ पासून जम्मु-काश्मिरमधील नियंत्रण रेषेजवळ निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाची परिस्थिती हाताळताना अथवा देशातील सर्व क्षेत्रात/अंतर्गत सुरक्षा मोहिमेत/चकमकीत धारातीर्थी पडलेल्या सैन्यदलातील तसेच सीमा सुरक्षा बल व इतर तत्सम निमलष्करी दलातील महाराष्ट्रातील अधिकारी/जवान यांना राज्य शासनातर्फे प्रत्येकी रु.५ लाख आर्थिक मदत दिली जाते. ही एकवेळची आर्थिक मदत शहीद जवानाची विधवा पत्नी, आई/वडील यांच्यामध्ये विभागून दिली जाते. तसेच उपरोक्त कार्यवाहीत अपंगत्व आलेल्या सदरहू दलांतील महाराष्ट्रातील अधिकारी/जवानांना त्यांच्या अपंगत्वाचे प्रमाण लक्षात घेऊन रूपये १ लाख किंवा रूपये ३ लाखापर्यंत आर्थिक मदत राज्य शासनातर्फे दिली जाते.

३. ध्वजदिन निधीतून माजी सैनिकांच्या पुनर्वसनाचे आणि त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणाचे अनेक कार्यक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील माजी सैनिकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी शहरांमध्ये जावे लागते. अशा पाल्यांकरिता राज्यात या निधीतून ४६ वसतीगृहे बांधण्यात आली असून यापैकी ३२ मुलांची व १४ मुलींची वसतीगृहे आहेत. सदर वसतीगृहांच्या देखरेखीचा खर्च देखील या निधीतून करण्यात येतो.

४.    महाराष्ट्राने गेल्या तीन वर्षात या निधीला मोठा हातभार लावला आहे. माजी सैनिकांसाठी असणा-या अनेक हितकारक कार्यक्रमांना चालना दिली. ही कर्तव्य भावना यावर्षी देखील उत्स्फूर्तपणे प्रकट होईल अशी खात्री आहे. सन २०११-२०१२ साठी या निधीत अठरा कोटी रुपये गोळा करावयाचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे. ध्वजदिन निधीत द्यावयाचे योगदान हे जिल्हा स्तरावर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात "जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय" आणि विभागीय स्तरावर "संचालक, सैनिक कल्याण विभाग" यांच्या नावाने धनादेशाद्वारे जमा करण्यात यावे. सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी ध्वजदिन निधीच्या संकलनासाठी कामाला लागले आहेत. हे कार्य फार मोठे आहे, उदात्त आहे. या कार्यास हातभार लावण्याच्या कामी निमशासकीय क्षेत्राने देखील मागे राहू नये. आतापर्यंत सहकार क्षेत्राने या कार्यात उत्तम योगदान दिले आहे. यावर्षी पूर्वीपेक्षाही जोरदार प्रतिसाद सर्वांकडून मिळण्याची मी अपेक्षा व्यक्त करतो.

५.    जिल्हा परिषदा, साखर कारखाने, शासकीय महामंडळे, सहकारी बँका, मार्केटिंग फेडरेशन इत्यादींनी अशा प्रत्येक बाबतीत राज्याच्या जबाबदारीतील आपला वाटा मनापासून उचलला आहे. याहीवेळी ते मागे राहणार नाहीत, अशी माझी खात्री आहे. तरी त्यादृष्टीने आपण प्रयत्नशील रहावे. ध्वजदिन निधीचे अपेक्षित उद्दीष्ट पूर्ण करण्यात मन:पूर्वक सहकार्य द्यावे, ही विनंती.

आपला,

**( पृथ्वीराज चव्हाण )**

प्रति,

१)  सर्व मंत्री/राज्यमंत्री
२)  सर्व सहकारी साखर कारखान्यांचे अध्यक्ष,
३)  सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाचे अध्यक्ष,
४)  सर्व महामंडळे , औद्योगिक बँका व मंडळे यांचे अध्यक्ष,
५)  सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष